0 7 NOV 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. भारती पाटील यांनी नव्या जाणिवेचा विद्यार्थी घडविला

## डॉ. किशोर बेडकीहाळ; सेवापूर्तीनिमित्त गौरव समारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : डॉ. भारती पाटील यांनी अध्यापनातून नव्या जाणिवेचा डोळस विद्यार्थी घडविला, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. किशोर बेडकीहाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. भारती पाटील यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ आज झाला. या वेळी ते बोलत होते. राज्यशास्त्र विभाग, माजी विद्यार्थी संघटना आणि राज्यशास्त्र परिषद यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर होते.

प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रेयश मोहिते व बाहुबली राजमाने यांनी सूत्रसंचालन केले. सन्मानपत्राचे



**कोल्हापूर : प्रा.डॉ.भारती पाटील यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ रविवारी (ता.६) शिवाजी विद्यापीठात झाला. या वेळी सरोज (माई) पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. टी. के. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, किशोर बेडकीहाळ, डॉ. व्ही. एम .पाटील, प्राचार्य टी. एस. पाटील आदी.**

वाचन प्रा. डॉ. शिवाजी पाटील यांनी केले.

या वेळी डॉ. बेडकीहाळ म्हणाले, की शिक्षक कसा असावा व कसा असला पाहिजे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. भारती पाटील आहेत. प्राध्यापक आणि सामाजिक चळवळीमध्ये मार्गदर्शक अशी त्यांची दोन रूपे आहेत. उपक्रमशीलता, सकारात्मकता, सामाजिकता आणि मूल्यात्मकता हे त्यांचे गुण सर्वांना प्रेरणा देणारे आहेत. त्यांनी शिबिरातून मार्गदर्शन करून चांगले कार्यकर्ते घडवले तर जाहीर सभा व व्याख्यानमालांतून चांगला सुसंस्कृत नागरी समाज घडावा या दृष्टीने प्रयत्न केले.

डॉ. आनंद मेणसे म्हणाले, ''सध्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये धोक्यात आलेली आहेत. ते आव्हान पेलण्यासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. भारती पाटील यांनी नेतृत्व करावे. गांधी आणि मार्क्सवादाचा विचार यांची सांगड कशी घालावी याचा विचार डॉ. पाटील यांनी मांडला आहे.''

सरोज पाटील म्हणाल्या, ''डॉ. भारती पाटील या सत्याला सत्य मानणाऱ्या, विद्यार्थ्यांचे चेहरे वाचणाऱ्या आणि त्यांच्या हृदयापर्यंत पोहचणाऱ्या आदर्श शिक्षिका आहेत. शिक्षकांनी आता लोकशाहीबाबत प्रबोधन करण्यासाठी पुढे आले पाहिजे.'' प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले. या वेळी डॉ. टी. एस. पाटील, डॉ. अमिता कणेगावकर, मिलिंद अष्टेकर, किरण लाड उपस्थित होते.

07 NOV 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात भारती पाटील यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात त्यांना सरोज पाटील, अशोक चौसाळकर, किशोर बेडकीहाळ यांच्या हस्ते मानपत्र देण्यात आले. यावेळी डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. टी. के. पाटील, आनंद मेणसे, मिलिंद अष्टेकर, शिवाजी पाटील, डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य टी. एस. पाटील उपस्थित होते.

# भारती पाटील यांनी नव्या जाणिवेचा विद्यार्थी घडवला

## किशोर बेडकीहाळ : शिवाजी विद्यापीठात सेवापूर्ती गौरव समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारती पाटील यांच्या अध्ययनातून नव्या जाणिवेचा डोळस विद्यार्थी घडविलेला आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. किशोर बेडकीहाळ यांनी रविवारी केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, माजी विद्यार्थी संघटना आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेमार्फत राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभाग प्रमुख डॉ. भारती पाटील यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अशोक चौसाळकर आणि अंनिसच्या अध्यक्षा सरोज ऊर्फ माई पाटील उपस्थित होत्या.

### दोन लाखांचा धनादेश

या कार्यक्रमात भारती पाटील यांनी संशोधन कार्यासाठी मदत म्हणून राज्यशास्त्र परिषदेकडे दोन लाखांचा धनादेश सुपूर्द केला.

डॉ. चौसाळकर म्हणाले की, भारती पाटील यांनी अध्यापन, प्रशासन, संशोधन, प्रबोधन यामध्ये समतोल साधून कर्तृत्वाचा ठसा उमटविला. सरोज पाटील म्हणाल्या की भारती ही सत्याला सत्य मानणारी, असत्याला सत्य मानणारी, विद्यार्थ्यांचे चेहरे वाचणारी आदर्श शिक्षिका आहे. डॉ. आनंद मेणसे म्हणाले की, सध्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये धोक्यात आलेली आहेत. ते आव्हान पेलण्यासाठी भारती पाटील यांनी नेतृत्व करावे.

भारती पाटील म्हणाल्या, एन. डी. पाटील, गोविंद पानसरे, जी.डी बापू लाड, अशोक चौसाळकर यांनी दिलेले वैचारिक बळ हे जीवनाच्या प्रत्येक संघर्षात कामी आले. मानपत्राचे वाचन शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पाटील यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. अमिता कणेगावकर, महाराष्ट्र एकीकरण समितीचे मिलिंद अष्टेकर, किरण लाड उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रकाश पवार यांनी केले. न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील परिचय करून दिला. सूत्रसंचालन श्रेयश मोहिते आणि बाहुबली राजमाने यांनी केले. प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

0 7 NOV 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. भारती पाटील यांनी नव्या जाणिवेचा विद्यार्थी घडवला

## डॉ. किशोर बेडकिहाळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिक्षक कसा असावा व कसा असला पाहिजे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. भारती पाटील होत. त्यांनी अध्ययनातून नव्या जाणिवेचा डोळस विद्यार्थी घडवला, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. किशोर बेडकिहाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, माजी विद्यार्थी संघटना आणि राज्यशास्त्र परिषद यांच्यातर्फे राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. भारती पाटील यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते.

डॉ. बेडकिहाळ म्हणाले, प्राध्यापक आणि सामाजिक चळवळीमध्ये मार्गदर्शक अशी त्यांची दोन रूपे आहेत. उपक्रमशीलता, सकारात्मकता, कामात व्यस्त, सामाजिकता आणि मूल्यात्मकता हे त्यांचे गुण सर्वांना प्रेरणा देणारे आहेत.

डॉ. आनंद मेणसे म्हणाले, सध्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. भारती पाटील यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात बोलताना डॉ. किशोर बेडकिहाळ.**

मूल्ये धोक्यात आलेली आहेत. ते आव्हान पेलण्यासाठी सर्वांनी पुढे येणे गरजेचे आहे.

सरोज पाटील म्हणाल्या, डॉ. भारती पाटील ही सत्याला सत्य मानणारी, असत्याला सत्य मानणारी व विद्यार्थ्यांचे चेहरे वाचणारी आणि त्यांच्या ह्रदयापर्यंत पोहोचणारी आदर्श शिक्षिका आहे. शिक्षकांनी लोकशाहीचे प्रबोधन करण्यासाठी आता पुढे आले पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, प्रशासन, अध्ययन, संशोधन, प्रबोधन यामध्ये डॉ. भारती पाटील समतोल साधत कार्यरत राहिल्या.

यावेळी सन्मानपत्राचे वाचन डॉ. शिवाजी पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. टी. एस. पाटील, डॉ. अमिता कणेगावकर, मिलिंद आष्टेकर, किरण लाड उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रकाश पवार यांनी केले. स्वागत, पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन श्रेयश मोहिते व बाहुबली राजमाने यांनी केले, तर आभार डॉ. रवींद्र भणगे यांनी मानले.

तरुण भारत

# नॅनो पदार्थांच्या गुणधर्मांचा अभ्यास करून निष्कर्ष काढा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अल्ट्रा–व्हायोलेट स्पेक्ट्रोस्कॉपी उपकरणाच्या माध्यमातून पदार्थाचे किंवा नॅनो–पदार्थाचे विविध गुणधर्मांचा अभ्यास करून सदर पदार्थांची उपयुक्तता कशासाठी आहे, यासंदर्भात निष्कर्ष काढता येतो, असे मत शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाचे डॉ. सागर डेळेकर यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठातील स्तुति कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सहाव्या दिवशी ते बोलत होते. विद्यापीठातील उपकरणे हाताळण्याची सहभागींना संधी मिळाली. स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले.

पुणे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळो वैज्ञानिक डॉ. सी. एस. गोपीनाथ म्हणाले, UVPES प्रदर्शित करणारा भारत हा जगातील सहावा तर उच्च दाबाच्या परिस्थितीत प्रदर्शित करणारा एकमेव देश आहे. पदार्थांच्या विविध गुणधर्मांचा अभ्यास करून त्याची



**कोल्हापूर : स्तुती कार्यक्रमात डॉ. एस डी. डेळेकर यांचा सत्कार करताना डॉ. सी. एस. गोपीनाथ.**

उपयुक्तता ठरवण्यासाठी अल्ट्रा व्हायोलेट स्पेक्ट्रोस्कॉपी उपयुक्त ठरतो. डॉ. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्तुती उपक्रमाची संपूर्ण टीम कार्यरत आहे. दुपारच्या सत्रामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना स्तुति अंतर्गत शैक्षणिक सहल म्हणून किल्ले पन्हाळाची सफर घडविली. तेथे शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थ विज्ञान विभागांतर्गत अवकाश संशोधन केंद्राला भेट दिली. येथील अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे अवकाश निरीक्षण केले. आकाशातील ताऱ्यांचा खेळ अनुभवण्याची अनोखी संधी सहभागींना मिळाली.

तरुण भारत

# औषध कंपन्यांकडून पार्टिकल ॲनालायझरचा पुरेपूर उपयोग

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन तंत्रांमुळे औद्योगिक क्षेत्रांनी खोकल्याच्या औषधांसह विविध प्रकारच्या औषधांमध्ये मोठे आणि सकारात्मक असे बदल केले आहेत. त्यासाठी कंपन्यांनी पार्टिकल साईज ॲनालायझरचा प्रभावीपणे उपयोग केला आहे, असे प्रतिपादन एमील लिमिटेड कंपनीचे पद्मनाभ मित्रगोत्री यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात स्तुतिअंतर्गत चालू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ब्रूकर इंडिया सायंटिफिक प्रा. लि. कंपनीचे तज्ज्ञ सचिन काटे व प्रा. एस. के. चक्रवर्ती हे उपस्थित होते. दरम्यान, कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात मित्रगोत्री यांनी पर्टिकल साइज ॲनालाइझर या उपकरणावर मार्गदर्शन केले. त्यानंतर स्तुती उपक्रमाचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी एक्स–रे फोटो इलेक्ट्रॉनिक स्पेक्ट्रोस्कॉपी या विषयी मार्गदर्शन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्तुतिअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात सचिन काटे यांचा सत्कार करताना प्रा. एस. के. चक्रवर्ती.**

दुसऱ्या सत्रात ब्रुकर कंपनीचे सचिन काटे यांनी सहभागींना एनएमआर स्पेक्ट्रोस्कॉपी या विषयी मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात नेऊन तेथील एनएमआर हे उपकरण दाखवून त्याची माहिती सांगितली.

जनसंपर्क कक्ष
0 6 NOV 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अत्याधुनिक उपकरण भारतात बनावीत

## काश्मिरचे डॉ. यसिर अली यांनी व्यक्त केली अपेक्षा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

रमण स्पेक्ट्रोस्कॉपी विविध क्षेत्रात वापरली जाते. वैद्यकीय क्षेत्रामध्ये फॉरेन्सिक सायन्स कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रसायनशास्त्र त्याचबरोबर स्ट्रक्चरल मोर्फोलॉजीसाठी अत्याधुनिक उपकरण सुविधा जगभर वापरली जाते. या अत्याधुनिक तंत्राचा शोध डॉ. सी. व्ही. रमण यांनी लावला आहे. अत्याधुनिक उपकरण भारतात बनवली पाहिजेत, अशी अपेक्षा डॉ. यासीर अली यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठातील स्तुति कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पाचव्या दिवशी ते बोलत होते. विद्यापीठातील उपकरणे हाताळण्याची सहभागींना संधी मिळाली. स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी अत्याधुनिक उपकरणाविषयींचे स्टार्टअप सुरू करावे, असे आवाहन केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्रचे प्रा. डी. एस. दगडे यांनी 'नियर इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कॉपी' या विषयावर मार्गदर्शन केले. 'रमण स्पेक्ट्रोस्कोपी' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वत:तील कमतरता स्वत:च शोधुन शर्यतीत उतरण्यासाठी जगाच्या धावपट्टीवर येणे महत्त्वाचे आहे. गेल्या पाच दिवसात अनेकांनी स्तुती कार्यक्रमाला भेट देऊन डॉ. सोनकवडे यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच देशपातळीवरील मोठ्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाल्याबद्दल समाधानही त्यांनी व्यक्त केले. तसेच काही संशोधकांनी आपल्या साधनांचे टेस्टिंगही केले.



**कोल्हापूर : स्तुती उपक्रमात काश्मीरचे डॉ. यासीर अली यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे डॉ. आर. जी. सोनकवडे.**

सकाळ

# 'रमण स्पेक्ट्रोस्कॉपी' देशांतर्गत बनवणे गरजेचे

## शास्त्रज्ञ डॉ. यासीर अली यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर, ता. ५ :** रमण स्पेक्ट्रोस्कॉपी ही सुविधा वेगवेगळ्या क्षेत्रांत वापरली जाते. वैद्यकीय क्षेत्रात फॉरेन्सिक सायन्स कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रसायनशास्त्र त्याचबरोबर स्ट्रक्चरल मोर्फोलॉजीसाठीही हे अत्याधुनिक उपकरण उपयुक्त आहे. जगभर त्याचा वापर केला जातो. हे उपकरण देशांतर्गत मोठ्या प्रमाणात बनवले पाहिजे, असे प्रतिपादन जम्मू-काश्मीरचे शास्त्रज्ञ डॉ. यासीर अली यांनी केले. शिवाजी विद्यापीठात सुरू असणाऱ्या स्तुती कार्यशाळेत ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठात स्तुती अंतर्गत चालू असलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पाचव्या दिवशी 'मेक इन इंडिया' च्या अंतर्गत बनवल्या जाणाऱ्या वैज्ञानिक उपकरणांची माहिती देण्यात आली. ही उपकरणे बनवण्याचे स्टार्टअप सुरू झाले पाहिजे, अशी अपेक्षा सैफ सुविधा केंद्राचे प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी विद्यार्थ्यांसमोर व्यक्त केली.

पहिल्या सत्रात प्रा. डी. एस. दगडे यांनी 'नियर इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कॉपी ' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. यासीर अली यांनी सहभागींना 'रमण स्पेक्ट्रोस्कोपी' या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'रमण स्पेक्ट्रोस्कॉपी ही सुविधा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वापरली जाते. इतक्या अत्याधुनिक तंत्राचा शोध खूप कमी साधनांमध्ये डॉ. सी. व्ही. रमण यांनी लावला. म्हणूनच हे अत्याधुनिक उपकरण जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या देशात बनवले गेले पाहिजे. स्वतःतील कमतरता स्वतःच शोधून शर्यतीत उतरण्यासाठी जगाच्या धावपट्टीवर येणे महत्त्वाचे आहे.''



**कोल्हापूर : डॉ. यासीर अली यांचा सन्मान करताना डॉ. आर. जी. सोनकवडे.**

0 6 NOV 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# सायबर गुन्ह्यांबाबत सजग व्हा

## मनीष पोळ : शिवाजी विद्यापीठात 'सायबर सुरक्षितते'वर व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आजच्या काळामध्ये जनजागृती नसल्यानेच सायबर गुन्हा हा इतर गुन्ह्याइतका गंभीर होत चालला आहे. यामुळे सायबर गुन्ह्याबाबत प्रत्येकाने सजग होणे गरजेचे आहे, असे आवाहन दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रांतर्गत ऑनलाइन कॉम्प्युटर सायन्सचे सहायक प्राध्यापक डॉ. मनीष पोळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत विद्यापीठ अनुदान आयोग राबवीत असलेल्या जनजागृती कार्यक्रमांतर्गत शनिवारी 'सायबर सुरक्षितता' या विषयावरील व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे होते.

यावेळी डॉ. पोळ म्हणाले, सायबर आणि सुरक्षितता यांचा अनन्यसंबंध आहे. देशात ७० टक्के लोक संगणक आणि मोबाइल वापरतात, त्यातील बहुतांश लोक इंटरनेट वापरतात, ते ऑनलाइनशी निगडित आहेत, त्यामुळे सायबर गुन्हा घडण्याचे प्रमाणही अधिक आहे. याबाबत जनजागृती नसल्यामुळे सायबर गुन्हे वाढत आहेत. आपली सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स वारंवार अपडेट केली पाहिजेत. व्हायरस अटॅकबाबत सजग असले पाहिजे असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी उपकुलसचिव सी.एस. कोतमिरे, सहायक कुलसचिव व्ही.एस. शितोळे उपस्थित होते. प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सहायक प्राध्यापक परशुराम देवळी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

लोकमत

# तरुणाईला योग्य दिशा देऊन ग्रामविकास साधणे शक्य : पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तरुणाईत जग बदलण्याची क्षमता आहे. त्यामुळे तरुणाईला योग्य दिशा दिली, तर ग्राम आणि देशविकास साधणे शक्य आहे, असे प्रतिपादन हिवरेबाजाराचे प्रवर्तक आणि आदर्श सरपंच पोपटराव पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित कार्यक्रमात त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

देशातील गावे जोपर्यंत स्वावलंबी होत नाहीत. तोपर्यंत देश स्वावलंबी आणि समृद्ध होणार नाही. जातीपातीच्या पलीकडे जात गावात विविध योजना राबवत कामे केली, तर गावात कितीही गटतट असले तरीही ग्रामविकास साधता येतो, असे पवार यांनी सांगितले. कॉलेजच्या आठवणींना उजाळा देत 'एनएसएस'मधील स्वयंसेवकांचे ग्रामीण विकासामधील योगदान सांगितले. शेतीतील असणारे बदल, वसुंधरा वाचवण्यासाठी जलसंधारणाचेदेखील महत्त्व त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. नीलम जाधव, डॉ. नितीन माळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

0 6 NOV 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सायबर गुन्ह्याबाबत सजगता आवश्यक : प्रा. डॉ. पोळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या काळामध्ये सायबर गुन्हा हा इतर गुन्ह्याइतका गंभीर होत चालला आहे. त्यामुळे सायबर गुन्ह्याबाबत प्रत्येकाने सजग होणे गरजेचे आहे. त्यासाठी सायबर सुरक्षितता महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत ऑनलाईन कॉम्प्युटर सायन्सचे सहायक प्रा. डॉ. मनीष पोळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने विद्यापीठ अनुदान आयोग राबवत असलेल्या जनजागृती कार्यक्रमांतर्गत 'सायबर सुरक्षितता' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे होते.

डॉ. पोळ म्हणाले, सायबर आणि सुरक्षितता यांचा अनन्यसंबंध आहे. आज देशात ७० टक्के लोक संगणक आणि मोबाईल वापरतात. त्यातील बहुतांश लोक इंटरनेट वापरतात. ते ऑनलाईनशी निगडित आहेत. त्यामुळे सायबर गुन्हा घडण्यासाठी ते जास्त धोकादायक आहे. सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती नसल्यामुळे सायबर गुन्हे वाढत आहेत. आपण सॉफ्टवेअर अप्लिकेशन वारंवार अपडेट केली पाहिजेत. तसेच व्हायरस अटॅक याबाबत आपण सजग असले पाहिजे. त्यासाठी आपण नेहमी अपडेट राहिले पाहिजे. सायबर हा गुन्हा असला तरी त्याबाबत जनजागृती झाल्यास तो कमी होऊ शकतो, असे डॉ. पोळ यांनी सांगितले.

यावेळी उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, सहायक कुलसचिव व्ही. एस. शितोळे, समन्वयक सहा. प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. परशुराम देवळी यांनी, तर डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.